12-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/11/2025 10:28 PM Page 1



निवडक



मोरजी : मिलाग्रीस चर्च वार्षिक फेस्ट निमित्ताने फादर प्रार्थना संबोधित करताना, उपस्थित ख्रिस्ती बांधव.

## मोरजी येथील मिलाग्रीस चर्चचे फेस्त उत्साहात साजरे

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ११** : मोरजी येथील सर्वात जुनी चर्च असलेल्या मिलाग्रीस चर्चे फेस अकरा रोजी सकाळपासून मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. सकाळी ७ वाजता पहिली प्रार्थना झाली. त्यावेळी फादर याने ख्रिस्ती बांधवांना संबोधित केले.

यावेळी मोठ्या संख्येने क्रिस्ती बांधव भक्तगण उपस्थित होते. शिवाय वेगवेगळी स्टॉल त्यामध्ये जास्तीत जास्त चणे शेंगदाणे यांचे स्टॉल परिसरात दिसून येत होते.

मोरजी येथील मिलाग्रीस चर्चची इमारत खूप जुनी गणली जाते. जवळ १२१ वर्षे या इमारतीला होत आहे.

अवर लेडी ऑफ मिलाग्रीस सायबिन माईचे फेस्ट मोठ्या उत्साहात साजरे करण्यासाठी ख्रिस्ती बांधवांनी पहाटेपासून या चर्चमध्ये उपस्थिती लावली होती. त्यात बालक युवक जेष्ठ नागरिक यांचाही समावेश होता. चर्च फादर आणि सह फादर आणि नियोजनबद्ध प्रार्थनेल संबोधित केले.

---

## आगरवाडा चोपडे पंचायतीची १८ रोजी ग्रामसभा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ११** : आगरवाडा चोपडे पंचायतीची ग्रामसभा बोलाविण्यात आली नसल्याने काही नागरिकांनी पेडणे गटविकास अधिकाऱ्यांकडे संपर्क साधल्या नंतर त्यांनी पंचायतीला लवकरात लवकर ग्रामसभा बोलाविण्याचा आदेश काढला. त्या आदेशाला अनुसरून आगरवाडा चोपडे पंचायतीची ग्रामसभा रविवार दि. १८ रोजी सकाळी १० वाजता पंचायतीच्या मिनी सभागृहात बोलाविली आहे.पंचायतीच्या प्रभारी सरपंच शिल्पा राऊत नाईक यांनी तशी नोटीस काढली आहे. त्यानुसार ज्यांना कुणाला या सभेत प्रश्न किंवा ठराव मांडायचा असेल तर त्या पंचायत क्षेत्रातील नागरिकांनी पंचायत कार्यालयात बुधवार दि. १४ रोजी पर्यंत पंचायत सचिवांकडे लेखी स्वरूपात सादर करावेत, असे कळविण्यात आले आहे.

यासभेत विविध विकास कामावर तसेच चर्चा करण्यात येणार आहेत तसेच विविध ठराव मंजूर करण्यात येणार आहेत. २०२४–२५ च्या सुधारित तसेच २०२५–२६ च्या अंदाज पत्रकास मान्यता देण्यात येणार आहे. २०२४ – २५ प्रशासकीय अहवालास मान्यता देण्यात येणार आहे.तसेच २०२४–२५ जमाखर्च तसेच २०२३–२४ लेखा तपासणी अहवालास मान्यता देण्यात येणार आहे.

मनरेगा अंतर्गत विकास कामे हाती घेण्याबाबतही या ग्रामसभेत निर्णय घेण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी या ग्रामसभेला उपस्थित राहावे, असे आगरवाडा चोपडे पंचायतीच्या प्रभारी सरपंच सौ शिल्पा राऊत नाईक यांनी कळविले आहेय

# मोरजी ग्रामसभेत रशियन फलक हटवण्याची मागणी

**२५ मीटर रस्त्याला विरोध** | **इंग्रजी, मराठी, कोकणी भाषेतच फलक लावण्यास सूचना**

■ टीम दैनिक हेराल्ड




**पेडणे, दि. ११** : रशियन भाषेतील फलक तत्काळ हटवावेत, तेमवाडा किनारी भागातील पार्किंग प्रकल्प कायदेशीर नियमांनुसारच उभारावा, तसेच गावात २५ मीटर रुंदीचे रस्ते नकोत, अशा विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर मोरजी ग्रामसभेत चर्चा करण्यात आली.

ग्रामस्थांनी पंचायत क्षेत्रात पुन्हा मोठ्या प्रमाणात रशियन भाषेतील फलक लावले जात असल्याची तक्रार केली. यावर उत्तर देताना सरपंच पवन मोरजे यांनी संबंधित व्यावसायिकांना फक्त इंग्रजी, मराठी आणि कोकणी भाषांमध्येच फलक लावण्यास सूचना दिल्या जातील, अशी ग्वाही दिली. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच पवन मोरजे होते. उपसरपंच सुप्रिया पोके, पंच मंदार पोके, रजनी शिरोडकर, स्वप्निल शेट गावकर, सुरेखा शेट गावकर, फटू शेटगावकर, विलास मोरजे आणि मुकेश गडेकर यांच्यासह पंचायत सचिव धावसकर यांचीही उपस्थिती होती.

सभेच्या सुरुवातीस लहराई देवी भक्तांवरील संकट आणि भारत–पाक युद्धातील शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मागील सभेचे इतिवृत्त वाचून त्याला मान्यता देण्यात आली. या बैठकीत पंचायतीच्या आर्थिक अंदाजपत्रकालाही मंजुरी देण्यात आली. तेमवाडा–मोरजी किनारी भागात पर्यटन खात्यांतर्गत सुमारे नऊ कोटी रुपयांचा पार्किंग प्रकल्प उभारण्यात येत आहे. तो पूर्णतः कायदेशीर परवानग्यांसह राबवावा, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली. यासंदर्भात अनंत शेटगावकर यांनी समुद्रस्नानासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी पार्किंगसुविधा पुरवण्यासाठी पंचायत काय उपाययोजना करणार, असा सवाल उपस्थित केला.

ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार, मोरजी पंचायत हद्दीत पुन्हा एकदा रशियन भाषेतील फलक झळकताना दिसत आहेत. हे फलक हटवून इंग्रजी, मराठी आणि कोकणी भाषांतील फलक लावण्यासाठी सरपंचांनी संबंधित व्यावसायिकांशी चर्चा करून कारवाई करण्याची तयारी दर्शवली. ग्रामस्थ सुभाष शेटगावकर यांनी वाचनालयात फक्त वर्तमानपत्रे उपलब्ध असून, इतर पुस्तके का नसावीत, असा प्रश्न उपस्थित केला. त्याचबरोबर मरडी वाडा भागात गेल्या पाच वर्षांपासून नळांना पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार करत जलवाहिनीजवळ बांधकाम झाले आहे का, याची तपासणी करावी, अशी मागणी केली.

गोविंद पोके यांनी गावात २५ मीटर रुंदीचा रस्ता कोणाच्या विनंतीवरून तयार करण्यात येत आहे, असा प्रश्न विचारून त्यास विरोध दर्शवला. त्यावर सरपंच पवन मोरजे यांनी या प्रकल्पासाठी जमीन संपादन प्रक्रिया सुरू असून कोणाकडूनही आक्षेप नोंदवला गेला नव्हता, असे सांगितले. मात्र, जर यास विरोध असल्याचे ग्रामसभेच्या ठरावातून स्पष्ट झाले, तर तो ठराव संबंधित खात्याकडे सादर केला जाईल, असे आश्वासन दिले.

ग्रामस्थांनी पंचायत कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यावर सचिवांनी लक्ष ठेवावे, अशी मागणी करण्यात आली. मुख्य जंक्शनवर सीसीटीव्ही बसवण्याची सूचना गोविंद पोके यांनी मांडली. तसेच अनेक खासगी वाहने व्यावसायिक उद्देशाने वापरली जात असल्याने त्यावर पंचायत काय कारवाई करणार, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला. सरपंच मोरजे यांनी या संदर्भात वाहतूक खात्याला पत्र पाठवता येईल, असे सांगितले. ग्रामसभेला अपेक्षेप्रमाणे नागरिकांची उपस्थिती नसल्याने दिलीप सावंत, अनंत शेटगावकर आणि सुभाष शेटगावकर यांनी पंचायत प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, मोरजाई देवस्थान महाजनांची सभा आणि गावात साजरा होणारा सण लक्षात घेता ही ग्रामसभा पुढे ढकलावी, अशी मागणी केली.सभेच्या शेवटी सरपंच पवन मोरजे यांनी सर्वांचे आभार मानत ग्रामसभा समाप्त केली.

## पाजीफोंडमध्ये सांडपाणी गळतीचा प्रश्न गंभीर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११** : जुंता क्वार्टर्स,पाजीफोंड परिसरात गेल्या आठवड्याभरापासून सुरू असलेल्या सांडपाण्याच्या गळतीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या समस्येकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांकडून करण्यात आला आहे.

स्थानिकांनी दिलेल्या माहितीनुसार, सांडपाणी प्रक्रिया न होता सरळ निवासी इमारतींमागील मोकळ्या जागेत वाहत आहे. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांचा उपद्रव वाढला आहे. या साचलेल्या सांडपाण्यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याचा धोका वाढला आहे.

सांडपाणी गळती ही केवळ गैरसोय नाही, तर गंभीर आरोग्यधोका आहे, असे जुंता क्वार्टर्स,मधील रहिवासी शोभा देसाई यांनी सांगितले. या समस्येची वारंवार तक्रार करूनही, अद्याप कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही. आम्ही दुर्गंधीत व घाणीत राहतो आहोत.

स्थानिकांनी सांगितले की, ही गळती भूमिगत पाईपलाईनच्या निकृष्ट अवस्थेमुळे होत आहे. या समस्येकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. विशेषतः लहान मुले व वृद्धांसाठी ही स्थिती अधिक घातक ठरत आहे. आमची मुले संध्याकाळी घराबाहेर खेळायला जातात. पण आता ती सांडपाण्याच्या जवळ जाऊ नयेत म्हणून आम्ही त्यांना अडवतो. आरोग्यावर गंभीर परिणाम होईपर्यंत प्रशासन जागं होणार का? असा सवाल रहिवासी मोहन नाईक यांनी उपस्थित केला.

दरम्यान, स्थानिक प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. सांडपाणी वाहून नेणाऱ्या खराब पाईपलाईनची त्वरित दुरुस्ती करण्यात यावी व संपूर्ण परिसरात जंतुनाशक फवारणी करून स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी पुढे येत आहे. सध्या तरी जुंता क्वार्टर्स मधील नागरिक संकटात असून, अधिकाऱ्यांकडून तातडीने ठोस कारवाई होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## बनावट इतिवृत्ताच्या आरोपावरून नावेली ग्रामसभेत तणाव

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११** : रविवारी नावेली ग्रामसभेतील झालेल्या तणावामुळे ही बैठक अचानक पुढे ढकलण्यात आली. सदस्यांनी पंचायत सचिवांवर गंभीर आरोप करत, बैठकीचे इतिवृत्त बनावट असल्याचे म्हटले. यामुळे ग्रामसभेतील वातावरण तणावपूर्ण बनले. सचिवांनी नवीन तारीख निश्चित करण्यास नकार दिला, ज्यामुळे आधीच नाराज असलेल्या गावकऱ्यांचा राग आणखी वाढला. रोझरी उच्च माध्यमिक शाळेच्या बांधकाम परवान्याच्या संदर्भातील निर्णयावर आपत्ती व्यक्त करणारे गावकरी अधिक चिडले होते. सुरुवातीपासूनच बैठकीत तणाव निर्माण झाला होता. सरपंच मायकल कार्डोझो अनुपस्थित होते, त्यामुळे त्यांच्या पोर्तुगीज नागरिकत्वाच्या मुद्यावर चर्चा होण्याची शक्यता होती. पंचायतीच्या ठरावावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले, विशेषतः शाळेच्या विस्तारासंबंधीच्या निर्णयाच्या कायदेशीरतेबाबत. कार्डोझो आणि रॉबिन रॉड्रिग्ज हे दोघेही परदेशी नागरिकत्वामुळे अपात्र ठरले होते, ज्यामुळे या ठरावाची वैधता प्रभावित झाली.

ग्रामसभेचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या उपसरपंच वेलिंडा डायस, शाळेच्या प्रकल्पासंबंधी आणि इतर महत्त्वाच्या बाबींच्या उत्तरांबाबत गोंधळात पडल्या होत्या. डायस हे डायोसेसन सोसायटी ऑफ एज्युकेशनचे सचिव फादर मारियानो डायस यांचे मेहुणे असल्याने हितसंबंधांचा मुद्दा आणखी गडद झाला. अँटोनियो अल्वारेस यांनी पंचायत मालमत्तेवर चर्चा केली आणि रोझरी कॉलेजमध्ये बेकायदेशीर मजले बांधण्यासाठी आरडीए निधीचा गैरवापर केल्याचा आरोप केला. ग्रामसभेने इतिवृत्तांतून महत्त्वाचे मुद्दे वगळल्याबद्दल तीव्र आक्षेप घेतला.

जर इतिवृत्तांत व्हिडिओ रेकॉर्डिंगचे प्रतिबिंब नसेल, तर आम्ही कारवाई करू, असा इशारा सायमन फर्नांडिस यांनी दिला. जॉर्ज बॅरेटो यांनी सार्वजनिक चर्चेशिवाय बांधकाम परवाना मंजूर केल्याबद्दल पंचायतीवर टीका केली. क्रूझ रॉड्रिग्ज यांनी नावेलीच्या वाहतुकीच्या समस्येबद्दल चिंता व्यक्त केली, ज्यामुळे कोंडी वाढली आहे. नावेली ग्राहक आणि नागरी मंचाच्या तक्रारीनंतर, टीसीपी विभागाने वाहतूक कोंडीबाबत पंचायतीला पत्र पाठवले होते. तथापि, गावकऱ्यांनी ते राजकीय दबाव म्हणून नाकारले. एका सदस्याने बांधकाम सुरू राहिल्यास दररोज पोलिसांना फोन करण्याची धमकी दिली, कारण नावेली जंक्शनवर दररोज ९,००० विद्यार्थ्यांचा धोकादायक प्रवास होत आहे.

## हणखणे परिसरात बोअर ब्लास्टींग ; नागरिकांच्या घरांना तडे

■ टीम दैनिक हेराल्ड


**पेडणे, दि. ११** : पेडणे तालुक्यातील आदर्श इब्रामपूर–हणखणे ग्रामपंचायत क्षेत्रात खडी क्रशरसाठी काळ्या दगडाच्या उत्खननासाठी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर बोअर ब्लास्टींग केल्याची तक्रार समोर आली आहे. या स्फोटांमुळे परिसरातील अनेक घरांच्या भिंतींना तडे गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या संदर्भात ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच कृष्णा नाईक यांनी स्थानिक प्रशासन आणि मोपा पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

नाईक यांनी दिलेल्या माहितीनुसार, खनिज उत्खननासाठी वापरण्यात येणारी स्फोटके ग्रामपंचायतीकडून अथवा इतर शासकीय यंत्रणांकडून अधिकृत परवानगीशिवाय वापरली जात असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. स्थानिक पोलीस आणि प्रशासनाकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याची टीका त्यांनी केली. ग्रामपंचायतीने स्टॉप बोअर ब्लास्टींग’ अशी नोटीस जाहीर करूनही खडी क्रशर मालकांनी ती धुडकावून दिली आहे. या नोटिशीनंतर मी मोपा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. मात्र, बिट पोलीस कर्मचारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारणे सांगत कारवाईस टाळाटाळ केली. उलट खाणमालकांना प्रकरण आपापसात मिटवण्याचा सल्ला दिल्याची माहिती मला मिळाली आहे, असे नाईक यांनी सांगितले.

सदर बोअर ब्लास्टींगमुळे हणखणेतील अनेक घरांमध्ये तडे गेले असून, नागरिकांचे आर्थिक नुकसान तर झालेच आहे, परंतु मानवी जीवनासही धोका निर्माण झाला आहे. या स्फोटांचा जोर इतका असतो की, दुपारी दीड ते अडीच या वेळेत मोठ्या प्रमाणावर आवाज होत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. दरम्यान, नाईक यांनी माहिती अधिकार कायद्यान्वये याबाबत अधिकृत कागदोपत्री माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असून, ती मिळाल्यानंतर न्यायालयात खटला दाखल करण्यात येणार असल्याची माहिती दिली. नाईक यांनी केलेल्या आरोपानुसार, बेकायदेशीर उत्खनन व्यवसायाला शासकीय यंत्रणेमधील काही अधिकाऱ्यांचा पाठींबा मिळत आहे. या व्यवसायामागे स्थानिक राजकीय शक्तींचा हात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने त्वरित दखल घेऊन यंत्रणांची चौकशी करावी, तसेच बेकायदेशीर उत्खनन थांबवून जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## कासारवर्णेत भीषण अपघात ; एकाचा मृत्यू

■ टीम दैनिक हेराल्ड



कासारवर्णे : अपघातातील वाहने.



सुहास नारुलकर

**पेडणे, दि. ११** : कासारवर्णे पेडणे येथे १० रोजी रात्री ९ वाजता एम एच ०४ एफएफ ३४४७ हे चार चाकी वाहन कासारवर्णे ते नागझर जात होते. त्या विरुद्ध दिशेने जीए ११ जे २६२९ या दुचाकीवरून सुहास मधुकर नारुलकर हा ४५ वर्षीय नागरिक आपल्या घरी जात असता, चार चाकी वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक देऊन

गंभीर जखमी केले. हॉस्पिटलमध्ये नेत असतानाच त्याचे वाटेतच निधन झाले. चार चाकीचे चालक विशाल नाईक (वय २३) मुंबई या वाहन चालकाला मोपा पोलिसांनी अटक केली.

महिंद्रा झायलो ही चार चाकी वाहन कासारवर्णे ते नागझरच्या दिशेने सुसाट वेगाने चालली होती, त्याचवेळी विरुद्ध दिशेने सुहास नारुलकर (वय ४५) नागरिक आपल्या दुचाकी वाहनाने घरी जात असता, त्याच्या दुचाकीला धडक दिल्याने चालक गंभीर जखमी केले. अपघाताची माहिती मोपा पोलिस स्टेशनला कळताच मोपा पोलिस स्टेशनच्या पोलिसांनी घटनेचा पंचनामा केला. आणि बेजबाबदारपणे वाहन चालवणाऱ्या विशाल गणेश नाईक यांना ताब्यात घेऊन त्यांना अटक केली.. सुहास नारुलकर हा नागरिक संतसोहिरोबानाथ आंबिये कॉलेज मध्ये चालक म्हणून काम करत होता.

## वाळपईमध्ये बीएसएनएलच्या केबल्सचे नुकसान

**नागरिक आणि व्यावसायिक इंटरनेट, दूरध्वनी सुविधांपासून वंचित**

■ टीम दैनिक हेराल्ड




**पर्ये, दि. ११ :** सत्तरी तालुक्यात भूमिगत वीज वाहिन्यांच्यासाठी सुरू असलेल्या खोदकामादरम्यान भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल)च्या केबल्सचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे संपूर्ण तालुक्यातील दूरसंचार सेवा ठप्प झाली असून, नागरिक आणि व्यावसायिक इंटरनेट व दूरध्वनी सुविधांपासून वंचित राहिले आहेत.

नेटवर्क अडथळ्यामुळे दररोज येणाऱ्या शेकडो तक्रारींच्या पार्श्वभूमीवर बीएसएनएलच्या वाळपई विभागाने शनिवारी स्थानिक पोलिस ठाण्यात वीज विभागाच्या कंत्राटदाराविरोधात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत अनेक ठिकाणी बीएसएनएलच्या केबल्सना नुकसान पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे.

बीएसएनएलचे वरिष्ठ अधिकारी यांनी माहिती देताना सांगितले की, वीज विभागाच्या कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे सत्तारी तालुक्यातील धावे–तार, झर्मे, वाळपई शहर आणि इतर भागांतील दूरसंचार सेवा कोलमडल्या आहेत. या गोंधळाचा फटका पोलिस यंत्रणा, आपत्कालीन सेवा तसेच अन्य सरकारी कार्यालयांनाही बसला आहे.

ते पुढे म्हणाले की , खोदकाम करताना केबल्सचे नुकसान टाळण्याची खबरदारी न घेता बेजबाबदार पद्धतीने काम सुरू आहे. त्यामुळे आमच्या सेवा सतत अडथळ्यांमुळे विस्कळीत होत आहेत. आम्ही याप्रकरणी पोलिस तक्रार दिली असून, संबंधित कंत्राटदाराने स्वतःच्या खर्चाने नुकसानभरपाई न भरल्यास त्यांच्या विरोधात कठोर कारवाई केली जाईल.

तालुक्यातील नेटवर्क सेवा खंडित झाल्याने बीएसएनएलच्या वाळपई कार्यालयात दररोज शंभरहून अधिक तक्रारींचे कॉल येत आहेत. केबल्सचे नुकसान भूगर्भात झाले असल्यामुळे त्यांचे नेमके स्थान शोधणे आणि दुरुस्ती करणे हे अधिकाऱ्यांसाठी अत्यंत कठीण झाले आहे.

## कामुर्ली पंचायत स्थलांतरितांवर ठेवणार कडक नजर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ११ :** सासष्टी तालुक्यातील कामुर्ली ग्रामपंचायतीने गावातील वाढत्या स्थलांतरित लोकसंख्येवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याचा ठराव रविवारी झालेल्या ग्रामसभेत मंजूर केला. कार्यवाहक सरपंच रीना डायस यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली.

ग्रामस्थांनी व्यक्त केलेल्या विविध समस्यांवर ग्रामसभेत चर्चा झाली. त्यामध्ये गावातील पारंपरिक जलस्रोताच्या प्रदूषणाची वाढती समस्या आणि निवासी परिसरांच्या सीमारेषांवर अतिक्रमणासारख्या पद्धतीने लावण्यात येणाऱ्या झाडांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याच्या बाबींचा समावेश होता.

कार्यवाहक सरपंच रीना डायस यांनी ग्रामसभेनंतर सांगितले की, गावात स्थलांतरितांची संख्या लक्षणीय वाढली असून, यामुळे कायदा व सुव्यवस्थेच्या तसेच सामाजिक सलोख्याच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होऊ शकतात, अशी गावकऱ्यांची भावना आहे. त्यामुळे घरमालकांसोबत विशेष बैठक घेऊन, भाड्याने खोली देताना योग्य माहिती व नोंदणी होणे अनिवार्य करणार आहोत.

स्थानिक झऱ्याच्या प्रदूषणावर चिंता व्यक्त करत डायस म्हणाल्या की, हा झरा गावासाठी महत्त्वाचा जलस्रोत आहे. मात्र, सध्या त्यात घाण टाकली जात आहे. वसंत ऋतू जवळ आल्याने संसर्गजन्य रोगांचा धोका वाढू शकतो. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागांना तात्काळ पत्र पाठवून हस्तक्षेप करण्याची विनंती केली जाईल. वाहतूक सुरळीत राहावी यासाठी गावातील रस्त्यांच्या कडेला कंपाऊंडबाहेर लावण्यात येणाऱ्या झाडांविरोधातही उपाययोजना करण्यात येत आहेत. झाडे रस्त्याच्या इतक्या जवळ लावल्याने मोठ्या वाहनांची वाहतूक अडते, आणि अपघाताचा धोका वाढतो,असे डायस यांनी नमूद केले.

या संदर्भात माजी सरपंच व सध्याचे पंच सदस्य बॅसिलियो फर्नांडिस यांनी माहिती दिली की, पंचायतीला वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून झाडे लावण्याबाबत परिपत्रक प्राप्त झाले आहे. त्यानुसार, संबंधित मालमत्ता धारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. झाडे वेळेत न काढल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल. ग्रामपंचायतीने गावातील प्रत्येक नागरिकाने स्वच्छता, सुरक्षितता आणि पर्यावरण रक्षणासाठी सुरू असलेल्या उपक्रमांमध्ये सहकार्य करण्याचे आवाहन करत ग्रामसभा संपवली.